## नियमित दिवाणी दावा क्र. ३९८/२०२३ मध्ये निशाणी क्र. ३१ कडील अर्जावर आदेश.

१) वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज प्रकरण आजच्या बोर्डावर घेऊन दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ६ यांच्याविरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. मी प्रस्तुतचा अर्ज वाचला. प्रस्तुत अर्जाच्याकामी वादीच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणाची मूळ नेमलेली तारीख ही दिनांक १३/०६/२०२४ अशी आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. १ व २ हे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत हजर झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ५ व ६ यांच्यावर दाव्याच्या समन्सची व नोटीसची बजावणी झाली आहे. परंतु, ते आजपर्यंत या प्रकरणात हजर झाले नाही. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्यावर अद्याप दाव्याच्या समन्सची व निशाणी क्र. ५ कडील अर्जाच्या नोटीसची बजावणी झालेली नाही. वादीने निशाणी क्र. ३४ कडील यादीसोबत प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. ५ यांना दिलेल्या नोटीसची प्रत दाखल केली आहे. सदरची नोटीस दिनांक २३/०५/२०२४ रोजी मिळाल्याबाबत त्यावर पोहोच आहे. त्या नोटीससंदर्भात तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याबाबत वादीने आजरोजी प्रकरण बोर्डावर घेऊन अर्ज दाखल केला आहे. अशा परिस्थितीत माझ्या मते प्रस्तुत अर्जावर म्हणणे देण्यास प्रतिवादींना संधी दिल्याशिवाय प्रतिवादींविरुद्ध कोणताही अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश पारित करणे उचित नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

### आदेश

१) प्रतिवादी क्र. १ व २ व प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी या अर्जास

म्हणणे द्यावे.

२) प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना या अर्जाची नोटीस काढावी.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE Date: 2024.06.12 17:34:54 +0530

दिनांकः– १२/०६/२०२४ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड. २रे सह दि.न्या. व. स्तर, कराड.